# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

---

**दिनांक २९.०९.२०२६ मंगळवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २८.०९.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये ०३ केसेसमध्ये ०३ ईसमावर कारवाई करून एकुण २,१३०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला. जुगार कायदा अन्वये ०२ केसेसमध्ये ०२ इसमांवर कारवाई करून एकुण ७९५/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये ३१ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १३० मोवाका अन्वये ८१ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये ३०० केसेस, रॉग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये ४९ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये ३९ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये ५१ केसेस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये १६ केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४बी(१) मोवाका अन्वये २३ केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये ११०४ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे ०९ केस, ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये २२ केसेस, बेदरकारपणे वाहन चालविणे ०३ केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण १,८२४ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. ५,५८,४००/—रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.**

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) वाडी पोलीसांची कामगीरी :— वाहन चोरी करणाऱ्या आरोपीस अटक. चोरीचे ०२ गुन्हे उघडकीस.**

दिनांक ०२.०८.२०२६ रोजी फिर्यादी निलेश श्रावणजी जुनघरे रा. व्याहाडपेठ, चौदामैल ता. हिंगणा जि. नागपूर हे आपले सासुरवाडी येथे त्यांचे हिरो स्प्लेंडर दुचाकी क्र. एम.एच. ४० एव्ही ४९८१ ने जात असता, १५.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे वाडी हद्दीत, अमरावती—नागपूर रोडवरील आठवा मैल येथे नैसर्गिक विधीकरीता थांबले असता, दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची नमुद गाडी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाडी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासात वाडी पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रीक तपास करून, तांत्रीक तपास करून तसेच, पोहवा. विजय वायदुडे यांना खात्रीशीर माहीती मिळाली की, आरोपी अरविंद उर्फ नाम्या विठ्ठल भोंडवे वय २५ वर्षे, रा. सुरावर्डी, बाना वाकोडे यांचे किराणा दुकानाजवळ, वाडी, नागपूर याने

दुचाकी चोरी केली असुन, तो वाडी ह्दीत फिरत आहे. अशा माहीतीवरून, त्याचा परीसरात शोध घेत असता, एक ईसम वर नमुद दुचाकीसह फिरत असतांना दिसुन आला. त्यास थांबवुन ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव अरविंद उर्फ नाम्या विठ्ठल भोंडवे वय २५ वर्षे, रा. सुरावर्डी, बाना वाकोडे यांचे किराणा दुकानाजवळ, वाडी, नागपूर असे सांगीतले. त्यास त्याचे ताब्यातील दुचाकी संबंधाने विचारपुस केली असता, त्याने वर नमुद वाहन चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीस अधिक सखोल विचारपूस केली असता, त्याने या गुन्ह्याव्यतीरिक्त पोलीस ठाणे वाडी हद्दीतुन इतर ठिकाणी एक मोबाईल चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीकडुन ०१ वाहनचोरी व ०१ मोबाईलचोरी असे ०२ चोरीचे गुन्हे उघडकीस आणलेले आहेत. आरोपीचे ताब्यातुन ०१ मोटारसायकल, रोख १,५००/—रू. व एक जुना वापरता मोबाईल असा एकुण ४३,५००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. सिंगा रेड्डी ऋषिकेश रेड्डी, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. १), मा. श्री. यशवंत नलावडे, सहा. पोलीस आयुक्त (एमआयडीसी विभाग), वपोनि. नितीन मगर यांचे मार्गदर्शनाखाली, सपोनि. कुणाल धुरट, पोहवा. विजय वायदुडे, नागेश दासरवार, राहुल नागदिवे, चंद्रकुमार टेकाम, पोअं. दिलीप बाजड यांनी केली.



**<u>३) सदर पोलीसांची कामगिरी :— अवैध हुक्का पार्लर चालकांविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक २८.०९.२०२६ चे १५.४५ वा. ते १६.२० वा. चे दरम्यान, सदर पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांना खात्रीशीर माहिति मिळाली की, पोलीस ठाणे सदर हद्यीत, बैरामजी टाऊन येथील आकार बिल्डर, बिल्डींग क्र. ९, फ्लॅट क्र. ०२ येथे अवैध हुक्का पार्लर सुरु आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन, नमुद ठिकाणी पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे फ्लॅटमालक आरोपी क्र. १) देवकुमार रमेश झांझोटे वय ४१ वर्ष, रा. बैरामजी टाऊन आकार बिल्डर, बिल्डींग क्र. ९, फ्लॅट क्र. ०२, सदर नागपूर हा त्याचे फ्लॅटमधील हुक्कापार्लर येथे काम करणारा वेटर आरोपी नामे २) हर्ष विजय कंगाले वय २० वर्ष, रा. राहाटे कॉलनी, दामोदर सोसायटी, प्लॉट क्र. ०३, धंतोली, नागपुर याचे मदतीने ग्राहक आरोपी ३) लक्की सुरेश आहुला वय २७ वर्ष व ४) यश दिनेश आहुला वय २७ वर्ष दोन्ही रा. शांतीनगर, नागपूर यांना शासनाने प्रतिबंधीत तंबाखुजन्य हुक्का पदार्थ सेवनाकरीता पुरवितांना समक्ष मिळुन आले. आरोपी हे विनापरवाना स्वत:चे आर्थिक फायदयाकरीता अवैधरित्या राहते फ्लॅटमध्ये हुक्कापार्लर चालवित असल्याचे निष्पन्न झाले. आरोपींचे ताब्यातुन हुक्का पार्लरकरीता उपयोगात येणारे साहित्य हुक्का पॉट, वेगवेगळे फ्लेव्हरचे तंबाखुजन्य हुक्का व ईतर साहित्य असा एकुण १२,३२५/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. फ्लॅटमालक, वेटर व ग्राहक असे एकूण ४ आरोपींविरूध्द पोलीस ठाणे सदर येथे कलम २२३ भा.न्या.सं सहकलम ४अ,२१अ सिगारेट आणि ईतर तंबाखु उत्पादने अधिनीयम—२००३, महाराष्ट्र सुधारणा अधिनीयम—२०१८.अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी वपोनि. ज्ञानेश्वर भेदोडकर यांचे मार्गदर्शनाखाली, पोउपनि. करणसिंग नागलोत, पोहवा. मोहनसिंग ठाकुर, मपोहवा. कविता क्षीरसागर व पोअं. पंकज तिवारी यांनी केली.

**४) गुन्हेशाखा युनिट क्र. ३ पथकाची कामगीरी :— खुनाचे गुन्ह्यातील पाहिजे ०२ आरोपींना अटक.**

दिनांक २४.०९.२०२६ चे २१.३५ चे सुमारास, पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत, जरीपटका चौक, जिंजर मॉल जवळ फिर्यादीचा मुलगा नामे आबिद उर्फ आबु रज्जाक शेख, वय १४ वर्षे, रा. गौतम नगर, सुधीर किराणा जवळ, जरीपटका, नागपूर हा त्याचा मित्र नामे अंतराल सिंह, रा. लुंबीनी नगर, ह.मु.— दत्तवाडी, नागपुर तसेच, अमानत ईकबाल शेख व त्यांचे ईतर मित्र उभे होते. फिर्यादीचा मुलगा आबु याचे दोन—तिन महीन्यांपुर्वी पाचपावली येथे राहणाऱ्या सोहेल खान नावाचे मुलासोबत झालेल्या भांडणाचे कारणावरून, सोहेल व त्याचे ईतर १०—१२ साथीदारांनी गैरकायद्याची मंडळी जमवुन, घटनास्थळी येवुन फिर्यादीचे मुलास व त्याचे मित्रांना शिवीगाळी करून त्यांचेवर दगड विटां फेकुन मारल्या तसेच फिर्यादीचे मुलास जिवे ठार मारण्याचे उद्देशाने शस्त्राने वार करून, त्याला गंभीर जखमी केले. तसेच त्याचा मित्र नामे अंतराल सिंह याचेवर वार करून जखमी केले. जखमींना उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल येथे नेले असता, उपचारादरम्यान डॉक्टरांनी फिर्यादीचे मुलास तपासुन मृत घोषित केले. अशा फिर्यादी श्रीमती तबस्सुम रज्जाक शेख, वय ३४ वर्षे, रा. गौतम नगर, सुधीर किराणा जवळ, जरीपटका, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे जरीपटका येथे आरोपीविरुध्द कलम १०३(१),१०९(१),३५१(२),३५२,१८९(२),१८९(४),१९०,१९१(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. जरीपटका पोलीसांनी गुन्हयातील आरोपी मनिष मनोज वैष्णव रा. नाईक तलाव व निलेश सुनिल आंबुरकर रा. वैशाली नगर, पाचपावली यांना यापुर्वी अटक केली होती व पाहिजे आरोपींचा शोध सुरु होता.

गुन्ह्याचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ३ पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून व मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, गुन्हयातील पाहिजे आरोपी क्र. १) रितीक संजय उसरबरसे वय २१ वर्षे, रा. सागर बियर बार मागे, वैशालीनगर, स्वीपर कॉलनी, पाचपावली, नागपूर २) लक्की अशोक चेवले वय १९ वर्षे, रा. कालीमाता मंदीर जवळ, पंचकुआ, रेल्वे पटरी लाईन जवळ, पाचपावली, नागपूर यांना ताब्यात घेतले. आरोपींना पुढील कार्यवाहीस्तव पाचपावली पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. अतुल मोहनकर व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.



**(गुन्हे)**

**पोलीस ठाणे इमामवाडा :— जिवानिशी ठार मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपींना अटक.**

पोलीस ठाणे इमामवाडा हद्दीत, इंदीरानगर, गल्ली क्र. १, जाटतरोडी, सुरेश किराणा जवळ राहणारे फिर्यादी तुषार चैनलाल सहारे वय २३ वर्षे हे आणि आरोपी १) विक्की रंजीत मेश्राम वय २८ वर्ष २) विनय

रंजीत मेश्राम वय २४ वर्ष ३) आंचल रंजीत मेश्राम वय २६ वर्ष हे एकमेकांचे शेजारी असुन, त्यांचेमध्ये जुन्या कारणावरुन वाद सुरू आहे. दिनांक २८.०९.२०२६ चे ००.३० चे सुमारास, फिर्यादी हे त्यांचा मित्र नामे सागर काळे याचा वाढदिवस साजरा करुन, आपले घरी जात होते. तेव्हा घराजवळच फिर्यादीचा लहान भाऊ नामे अतुल सहारे हा आरोपी क्र. २ सोबत बोलण्याकरीता गेला असता, त्यास आरोपीने अश्लिल शिवीगाळ केली. तसेच आरोपी क्र. १ व ३ यांनी नमुद ठिकाणी येऊन, त्यांनीही फिर्यादी व फिर्यादीचे भाऊ तसेच, भांडणामध्ये आलेल्या फिर्यादीचे आईस शिवीगाळ करीत, आरोपींनी संगणमत करून, फिर्यादी व त्यांचे भावास जिवानिशी ठार मारण्याचे उद्येशाने फिर्यादी व फिर्यादीचे भावाचे डोळयात कोणतातरी स्प्रे मारुन, त्यांचे जवळील शस्त्राने मारून गंभीर जखमी केले. तसेच, फिर्यादीचे आईला आरोपी क्र. ३ ने चप्पल व हातबुक्कीने मारहाण करुन किरकोळ जखमी केले. गंभीर जखमींचा उपचार मेडीकल हॉस्पिटल येथे करण्यात आला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे इमामवाडा येथे आरोपीविरुध्द कलम १०९(१),११८(१),११५(२),२९६,३५२,३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करुन, गुन्हयाचे गांभिर्य लक्षात घेता घटनास्थळी भेट दिली. तसेच, आरोपींचा तात्काळ शोध घेऊन, आरोपी क्र. १) विक्की रंजीत मेश्राम वय २८ वर्ष व २) विनय रंजीत मेश्राम वय २४ वर्ष यांना अटक केली आहे. आरोपींचा अभिलेख तपासला असता, आरोपी क्र. २ विरुध्द शरीराविरुध्दचा गुन्हा दाखल असल्याचे दिसुन आले. पुढील तपास सुरु आहे.

**(मिसींग)**

**पोलीस ठाणे कोराडी :—** राजकुमार ताराचंद वाघमारे वय ५० वर्षे, रा. नवीन कोराडी, वार्ड क्र. ४, वेटरनरी हॉस्पिटल जवळ, कोराडी, नागपूर हे दिनांक १७.०९.२०२६ रोजी पोलीस ठाणे कोराडी हद्दीतील वंजारी भवन, पारवे पानटपरी येथुन बेपत्ता झाले आहेत. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग—गव्हाळ, चेहरा—लांबट, बांधा—मध्यम, उंची—६ फुट, केस—काळे, अंगात— निळा फुलशर्ट व मेहरुन रंगाचा फुलपॅन्ट व काळी चप्पल घातलेली आहे. भाषा—हिंदी/मराठी बोलतात. ओळखचिन्ह—त्यांचे शरीराचे उजवे बाजुस लकवा मारलेला असून त्यामुळे ते हळु चालतात.



राजकुमार

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**